**नियमित दिवाणी कज्ञा क्र.२३/२०२३ मधील नि.क्र. २६ वरील आदेश**

( पारीत दिनांक – १९/०९/२०२४)

नवसाबाई दादू हवालदार इ.१ वि. पारुर्बा बाळू हवालदार इ. ४

**CNR - MHKO130000972023**

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र. ३ आक्काताई भाऊ हवालदार या मयत असून त्यांचे नावासमोर 'मयत' असे नमुद करण्याकरीता दाखल केलेला आहे.

२. वादीच्या कथनानुसार, प्रस्तुत कामातील प्रतिवादी क्र. ३ आक्काताई भाऊ हवालदार हया मयत असून त्यांचे सर्व वारस रेकॉर्डवर आहेत. तरी, प्रतिवादी क्र. ३ यांचे नावासमोर मयत असे नमुद करणेस परवानगी मिळणेकरीता सदरचा अर्ज दाखल करण्यात आला आहे.

३. सदरील अर्जास प्रतिवादी यांनी अर्जाच्या मागील बाजूस त्यांचे म्हणणे दाखल केले असून सदरच्या अर्जातील नमुद मजकूर खोटा व चुकीचा असल्याचे कथन केले आहे. प्रस्तुत प्रतिवादी क्र. ३ या दि. २३/०७/२०२३ रोजी मयत झालेल्या आहेत. त्यानंतर जवळपास १ वर्षानंतर सदरचा अर्ज दाखल झालेला आहे. प्रस्तुत प्रतिवादी यांच्याविरुध्द सदरचा दावा अबेट झालेला आहे. त्यामुळे, अबेटची पूर्तता झालेखेरीज कमी करता येणार नाही. त्याचप्रमाणे मयताचे दावा मिळकतीमध्ये हिस्से विनावाटप राहण्याची शक्यता आहे. तसेच कायदेशीर अडचण येण्याची शक्यता आहे. तरी, सदरचा अर्ज कायदयाने चालणेस पात्र नसल्याने नामंजूर करणेत यावा अशी विनंती प्रतिवादीने केली आहे.

४. उभय बाजुच्या विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले.

५. प्रस्तुत प्रकरणी दावा सन २०२३ साली दाखल झाला आहे व दावा हा कायम मनाई होवून मिळणेकरीता व सरसनिरस मानाने वाटणीसाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत प्रकरणातील प्रतिवादी क्र. ३ या मयत असून त्यांचे नावासमोर 'मयत' असे नमुद करणेस परवानगी मिळावी अशी विनंती वादीने प्रस्तुत अर्जान्वये केलेली आहे असे सदर अर्जाचे अवलोकन करता दिसून येते. अर्जातील नमुद कारणांचा विचार करता प्रतिवादी क्र. ३ हया मयत असून त्यांचे नाव याआधीच रेकॉर्डवर आहेत. त्यामुळे, अर्जातील नमुद कारणांचा विचार करता, तांत्रिक त्रुटी राहू नये याकरीता वादीने सदरचा अर्ज दाखल केला आहे असे दिसते. अर्जातील नमुद कारणांचा विचार करता, सदरचा अर्ज मंजूर करणे योग्य व न्यायोचित राहील असे वाटते. सबब, अर्ज मंजूर करणेस पात्र असून खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहेः–

**– आ दे श –**

१) अर्ज (निशाणी क्र. २६) वादीनी प्रतिवादी यांना आजतारखेपासून ०७ दिवसांच्या आत रक्कम रु. ५००/– खर्च स्वरुपात देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२) वादीनी मंजूर अर्जाप्रमाणे प्रस्तावित दुरुस्ती दाव्यामध्ये आज तारखेपासून १४ दिवसांच्या आत करुन घ्यावी व त्याप्रमाणे सुधारित प्रत अभिलेखावरती त्वरीत दाखल करावी.

PRANITA SUHAS PATIL
Digitally signed by PRANITA SUHAS PATIL
Date: 2024.09.19 17:16:39 +0900

कागल. (प्रणिता सुहास पाटील)

दिनांक – १९/०९/२०२४ सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कागल.